महाराष्ट्र पोलीस

# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/१५० २०२४ दि. २४/०८/२०२४

## "वाहतुक नियंत्रण अधिसुचना"

**ज्याअर्थी,** ठाणेनगर वाहतुक उप विभागाचे हद्दीत दि. २४/०८/२०२४ रोजी आनंद आश्रम टेंभीनाका या ठिकाणी सत्यनारायणाची महापुजा असल्याने सदर ठिकाण मा. मुख्यमंत्री सो, महाराष्ट्र राज्य मुंबई हे उपस्थित राहणार आहेत. सदर वेळी आनंद आश्रम या ठिकाणी मोठया प्रमाणात गर्दी होणार असून वाहतुक सुरळीत व सुरक्षीत रहावी, वाहतुकीची कोंडी होवु नये, या करीता आम जनतेच्या सोईसाठी,

**त्याअर्थी,** मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे:–

**प्रवेश बंद** – १) कोर्टनाका कडून आनंद आश्रम समोरून टॉवरनाका कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक** समोर **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग** – सदरची वाहने डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथून पुढे सरळ जांभळीनाका मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद** – २) ठाणे रेल्वे स्टेशनकडून टॉवरनाका मार्गे टेंभीनाका कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **टॉवरनाका** येथे **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग** – सदरची वाहने टॉवरनाका येथून डावे वळण घेवून गडकरी सर्कल मार्गे इच्छीत स्थळी जातील.

सदरची अधिसुचना दि. २४/०८/२०२४ रोजी सायंकाळी १९:०० वा. ते रात्रौ २३:०० वा. पर्यंत अंमलात राहील.

सदरची वाहतुक अधिसुचना ही पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, पोलीस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनास लागु राहणार नाही.

( पंकज शिरसाट )<br>
पोलीस उप आयुक्त,<br>
वाहतूक विभाग, ठाणे शहर

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर<br>
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर<br>
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर<br>
मा. जिल्हाधिकारी, ठाणे<br>
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे<br>
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१/वि.शा. ठाणे

CamScanner

**प्रत कार्यवाहीसाठी :–**

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे,
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे, भिवंडी
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे

प्रत:– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– सपोआ वाहतूक विभाग, ठाणे व पो.निरी. नौपाडा, ठाणेनगर, कळवा, राबोडी वाहतूक उपविभाग ठाणे.

CamScanner